## गवतफुले

खुलत्या वयात झुलते
हिरवे तन मन-पाते
सळसळ वाहे रानी
अंतरी पालवी गुपिते ||

टिपूस कोवळा रुजतो
मातीत सुरावट गातो
उत्फुल तरारे स्वप्न
रंगीत सुगंधी फुलतो ||

नभी इंद्रधनूची वेणी
फुलवीत शृंगार-लेणी
जणू निसटले पाचू
सांडले लक्ष तृणपर्णी ||

नवथर फुलपाखरू
कौतुके सांग भिरभिरू
दव आनंदाचा भारी
फुल म्हणे, कसे आवरू ?

क्षण जगण्याचा केवढा?
उमलून राहिला थोडा
तरी तजेला कायम
जरी वैशाखाचा कोरडा ||

**-- संध्या रानडे**